श्री.मारूती कुशाप्पा घेवडे यांना मा.न्यायालयाच्या आदेशानुसार न्या.कालेलकर करारानुसार पूर्वलक्षी प्रभावाने रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः काव्यआ-२४११/प्र.क्र.१९६/आस्था-१०,
बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ,
फोर्ट,मुंबई-४०० ०३२,
तारीख: **६ फेब्रुवारी,२०१६.**

वाचा -

1. **शासन निर्णय क्रमांकः सार्वजनिक बांधकाम विभाग,क्र.रुअआ-१५९६/२२८/सेवा-५, दि.२४ एप्रिल,२००१.**
2. **विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.विकास/आस्था-२ (२)/कावि/१२/२०११, दि.१९.३.२००८.**

प्रस्तावना

रोजंदारी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना न्या. कालेलकर करारानुसार पूर्वलक्षी प्रभावाने रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने धोरणात्मक निर्णय घेतला असून, जे कर्मचारी सार्वजनिक बांधकाम विभाग, दि.२४ एप्रिल, २००१ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करतील त्यांना न्या.कालेलकर करारानुसार फायदे देण्यासाठी रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यास पात्र ठरविले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. २४.४.२००१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील अट क्र. १ नुसार रोजंदारी / कार्यव्ययी आस्थापनेवरील जे कर्मचारी शासन सेवेत /जिल्हा परिषद सेवेत कार्यरत आहेत आणि त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून त्यांच्या सलग सेवेस उशीरात उशीरा दि.३१.१२.१९९८ रोजी ५ वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि करारातील अटींची पूर्तता करतील अशा कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यास पात्र ठरविले आहे. तसेच अट क्र. २ नुसार रोजंदारी / कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यामुळे शासकीय सेवेतून कमी करण्यात आले होते. तथापि, ज्या कर्मचाऱ्यांनी अशा कपातीविरुध्द न्यायालयात दावे दाखल कलेले आहेत, अशा कर्मचाऱ्यांपैकी ज्यांना न्यायालयाच्या निर्णयानुसार पुन:स्थापित करण्यात आलेले आहे. अशा कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यास पात्र ठरविले आहे.

२. न्या. कालेलकर करार मागणी-१ रोजंदारी आस्थापना परिच्छेद-२८ मध्ये नियमित आस्थापनेवर नेमणूक मिळण्याबाबत पुढील तरतूद आहे. "रुपांतरित अस्थायी आस्थापनेवर कामगार नेमला गेला की, त्याला मुंबई मुलकी सेवा नियम लागू होतात."

३. न्या. कालेलकर करारातील वरील तरतूद तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२४.४.२००१ च्या शासन निर्णयातील वर परिच्छेद- ३ व ४ मध्ये नमूद तरतूदींच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांनी पाठविलेल्या प्रस्तावाची छाननी केली असता, असे दिसून येते की, श्री.घेवडे हे रोजंदारी मैलकामगार म्हणून उप

विभाग (बांधकाम) पंचायत समिती, आजरा येथे दि.१.११.१९८० पासून कार्यरत होते. दि.२०.६.१९९१ पासून त्यांना काम उपलब्ध नसल्याने जि.प.कोल्हापूर यांनी कामावरून कमी केले. त्यामुळे श्री.घेवडे यांनी मा.कामगार न्यायालय, कोल्हापूर येथे तक्रार क्र.युएलपी-३३७/१९९२ दाखल केली. त्यावर मा.कामगार न्यायालयाने दि.६.१०.२००१ रोजी निकाल दिला. मा.कामगार न्यायालयाने पुढील आदेश दिलेले आहेत.

१) मारूती कुशाप्पा घेवडे यांना कामावर हजर करून घ्यावे.

२) श्री.घेवडे यांना सेवा सलगता देण्यात यावी.

३) सेवेतून काढल्यापासून सेवेत घेईपर्यंतच्या कालावधीतील ४०% वेतन देण्यात यावे.

४. मा.कामगार न्यायालयाच्या वरील आदेशानूसार श्री.घेवडे यांना ४.२.२००८ पासून जिल्हा परिषद सेवेत घेण्यात आले. तथापि, मा.कामगार न्यायालय, कोल्हापूर यांच्या निर्णयाविरूध्द जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी मा. औद्यागिक न्यायालय, कोल्हापूर येथे अपील युएलपी क्र.७०/२००१ दाखल केले होते, मात्र मा.औद्योगिक न्यायालयाने सदर अपील खारीज (Dismissed) केले. त्यामुळे जि.प. कोल्हापूर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटिशन नं.२१७२/२००४ अन्वये याचिका दाखल करण्यात आली. सदर रिट पिटिशनचा निकाल दि.२७.४.२००६ रोजी लागला असुन, सदरचा दावा मागे घेण्यात आला असून श्री.घेवडे यांनी रूपांतरित अस्थायी आस्थापनेवर घेण्याची विनंती करून मा.कामगार न्यायालय, कोल्हापूर यांच्या निकालाप्रमाणे देय असलेल्या मागण्या व आर्थिक फायदे सोडुन देण्यास तयार असलेबाबत प्रतिज्ञापत्र दिले आहे.

५. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२४ एप्रिल, २००१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील अट क्र.(२) (अ) नुसार ज्यांना न्यायालयाच्या निर्णयानुसार सेवेत पुनःस्थापित करण्यात आलेले आहे, असे कर्मचारी रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यास पात्र ठरतात. यानुसार श्री. घेवडे हे दि.१.१.१९८५ पासून रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यास पात्र ठरतात. विभागीय आयुक्त, पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावातील तपासणी सूचीत श्री.घेवडे यांना दि.२६.६.१९९६ पासून रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यास पात्र ठरवीले आहे. परंतु मा.कामगार न्यायालय, कोल्हापूर यांच्या निर्णयाचे अवलोकन केले असता श्री.घेवडे यांना सेवा सलगता देण्यात आलेली आहे. त्यामुळे श्री. घेवडे हे दि.१.१.१९८५ पासून रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यास पात्र ठरतात.

शासन निर्णय

रोजंदारी/कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.रुअआ-१५९६/२२८/सेवा-५, दि.२४.४.२००१ मधील तरतूदी विचारात घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्ट-"अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागीय आयुक्त, पुणे यांचे प्रस्तावातील श्री. मारूती कुशाप्पा घेवडे, मैलकामगार या कर्मचाऱ्यास रुपांतरित अस्थायी आस्थापनेवर घेण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार या निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-"अ" मधील रोजंदारी कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र.६ मधील पदावर व रकाना क्र.७ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यास शासन मान्यता देत आहे:-

२. शासनाच्या या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांना रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर आणल्यानंतर त्यांना मा.कामगार न्यायालयातील तडजोड नाम्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यास दि.४.२.२००८ पूर्वीचे कोणतेही आर्थिक

लाभ देय होणार नाहीत. तसेच,त्यांना न्या.कालेलकर कराराच्या तरतूदीनुसार अनुज्ञेय ठरणाऱ्या वेतनवाढीतील फरकाचे विनियमन पुढील प्रमाणे करण्यात येईल:-

१) जिल्हा परिषद, कोल्हापूर मधील श्री.घेवडे यांना दि.४.२.२००८ पासून त्यांचे रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापर्यंतच्या वेतनवाढीतील फरकाची रक्कम (सर्व प्रकारच्या भत्त्यासहित) ही त्यांच्या नांवे काढलेल्या धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी.

२) श्री.घेवडे यांची रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून दि.३१/१२/२०१५ पर्यंतच्या वेतन वाढीतील फरकाची रक्कम (सर्व प्रकरच्या भत्त्यासहित) सन-२०१५-२०१६ या आर्थिक वर्षापासून त्या त्या वर्षाच्या जून महिन्यांत संबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीत दहा (१०) समान हप्त्यात जमा करण्यात यावी व प्रत्येक हप्ता त्यांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा झाल्यापासून ३ वर्षापर्यंत सदर रक्कम त्यांना खात्यातून काढता येणार नाही.

३. वर नमूद केलेल्या थकबाकीच्या रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय असणार नाही आणि संबंधित कर्मचाऱ्यांकडून अथवा दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसाकडून भविष्यात व्याजाबाबतची मागणी करण्यांत येणार नाही, अशाप्रकराचे प्रतिज्ञापत्र त्यांनी जिल्हा परिषदेला सादर करणे बंधनकारक राहील.

४. संबंधित जिल्हा परिषदांनी या शासन निर्णयान्वये कर्मचाऱ्यांना चालू आर्थिक वर्षात अदा करावा लागणारा खर्च मंजूर अनुदानातून करावयाचा आहे.

५. रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर, सदर आदेश कर्मचाऱ्यांस मान्य नसल्यास त्यांनी त्याबद्दलचे लेखी प्रतिवेदन त्याला व्यक्तीनिहाय आदेश मिळाल्यापासून तीन महिन्यात सादर करणे आवश्यक आहे. या मुदतीत कोणतेही प्रतिवेदन प्राप्त न झाल्यास त्याचे काढलेले व्यक्तीनिहाय आदेश अंतिम समजण्यात येतील व त्यानंतर त्याची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

६. अस्थायी आस्थापनेवर रुपांतरित झालेले पद संबंधित पदधारक ज्या दिनांकापर्यंत सेवेत असतील त्या दिनांकापर्यंत चालू ठेवण्यात येत आहे.

७. हे आदेश शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग,क्र.रुअआ-१५९६/२२८/सेवा-५, दि.२४ एप्रिल, २००१ अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०६१४०३३८३७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Govind Mahadev Mainkar

Digitally signed by Govind Mahadev Mainkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Govind Mahadev Mainkar
Date: 2016.02.10 12:33:09 +05'30'

गोविंद माईणकर
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) महालेखापाल,महाराष्ट्र-१ मुंबई/ महाराष्ट्र-२,नागपूर,

२) प्रधान सचिव, वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

३) सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

४) विभागीय आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर.

६) मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

७) मा.राज्यमंत्री, (ग्रा.वि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

८) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,कोल्हापूर.

९) वित्त विभाग (व्यय-१५) मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

१०) निवड नस्ती, कार्यासन आस्था.१०,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

परिशिष्ट-"अ"

शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.काव्यआ-२४११/प्र.क्र.१९६/ आस्था-१०,
दिनांक- ६ फेब्रुवारी,२०१६,चे सहपत्र.

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नांव	आस्थापनेचा प्रकार रोजंदारी/ कार्यव्ययी	नेमणूकीचे पद	विभागाचे नांव	रुपांतरित अस्थायी आस्थापनेवर घ्यावयाच्या पदाचे नांव	ज्या दिनांकापासून रुपांतरित अस्थायी आस्थापनेवर घ्यावयाचे आहे तो दिनांक
१	२	३	४	५	६	७
१	श्री.मारूती कुशाप्पा घेवडे	कार्यव्ययी	मैल कामगार	बांधकाम विभाग, पंचायत समिती, आजरा जि.प. कोल्हापूर	मैल कामगार	१.१.१९८५